<u>गोपनीय</u>

**क्रमांक : का.स./बैठक/२५५**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
<u>मुंबई - ४०० ०५१.</u>
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५५व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२८/११/१७
सचिव,
कार्यकारी समिती

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, <u>मुंबई - ४०० ०१८.</u> | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, <u>मुंबई - ४०० ०२५.</u> | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, <u>मुंबई - ४०० ०२१.</u> | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

**<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५५वी बैठक</u>**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०९ नोव्हेंबर, २०१७ (गुरुवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ३.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br><u>मुंबई – ४०० ०३२</u>** |

**<u>उपस्थित सदस्य :</u>**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुमीत मल्लिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. भा. गाडगे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. तानाजी भोसले
मुख्य अभियंता (सिव्हिल),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बी. एम. भद्रगोंड
मुख्य अभियंता,
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज-१, २ व ३ करीता निविदा स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्तांनी प्रकल्पाची प्रस्तावना करताना असे नमूद केले की, मुंबई पारबंदर प्रकल्पामध्ये मुंबई शहरातील शिवडी व नवी मुंबईतील चिर्ले यांना जोडणाऱ्या २२ कि.मी. लांबीच्या ६ पदरी (३+३ मार्गिका) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी सुमारे १६.५ कि.मी. असून जमिनीवरील पुलाची (land viaduct) लांबी सुमारे ५.५ कि.मी. इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी येथे आणि नवी मुंबईतील शिवाजी नगर येथे व राष्ट्रीय महामार्ग-४ ब वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchanges) आहेत.

३.२ महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाचा प्रस्ताव सुमारे ३० वर्षांपासून विचाराधीन होता. हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्त्वावर (PPP) राबविण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने यापूर्वी सन २०१३ मध्ये निविदा मागविल्या होत्या. परंतु सदर निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही.

३.३ तद्नंतर, मुंबई पारबंदर प्रकल्पाची अंमलबजावणी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (जायका) (Japan International Cooperation Agency - JICA) या जपानी संस्थेकडून कर्ज

प्राप्त करून इंजिनिअरींग-प्रोक्युरमेंट-कन्स्ट्रक्शन(डिझाईन-बिल्ड) (EPC-Design Build) पद्धतीने करण्याचे ठरविण्यात आले. जायकाने या प्रकल्पाच्या सर्वेक्षणाकरीता सल्लागार नियुक्त करून सदर प्रकल्पाकरीता कर्ज देण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याकरीता त्यांचे सल्लागाराकडून माहे एप्रिल,२०१५ ते नोव्हेंबर,२०१५ या कालावधीत प्रकल्पाचे सर्वेक्षण (Preparatory survey) केले. या सर्वेक्षणामध्ये तांत्रिक बाबींसोबतच प्रकल्पाचा पर्यावरणावर व सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यात आला. प्राथमिक सर्वेक्षणाअंती जायकाने तयार केलेल्या अंतिम अहवालामध्ये नमूद केल्यानुसार जायकाने प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत सुमारे रु.१७,८४३ कोटी इतकी निश्चित केली. या किंमतीमध्ये बांधकामाची किंमत (सुमारे रु.१३,३८५ कोटी), आकस्मिक बाबींवरील खर्च (सुमारे रु. १३४० कोटी), भूसंपादन (सुमारे रु.९९६ कोटी) आणि सल्लागार सेवा, लवाद, प्रशासकीय खर्च, वॅट, आयातीवरील कर, बांधकामाच्या कालावधीतील व्याज इ. बाबींचा (सुमारे रु.२,१२२ कोटी) समावेश असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. जपानी तसेच अन्य आंतरराष्ट्रीय मानकांत सुचविल्याप्रमाणे, पुलाची लांबी लक्षात घेऊन अपघातासारख्या आपात्कालीन बाबींचा विचार करता ६ मार्गिकांच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी २.५ मी रुंदीची मार्गिका असावी अशी शिफारस जायकाने केली. त्याचप्रमाणे प्रकल्पाचे बांधकाम जलदगतीने होण्याच्या दृष्टीने पुलाच्या मोठ्या गाळ्यांकरीता (Obligatory spans) पोलादाचे सुपरस्ट्रक्चर वापरण्याचे जायकाने प्रस्तावित केल्याचेही महानगर आयुक्तांनी नमूद केले. प्रकल्पाच्या वरीलप्रमाणे एकूण अंदाजित किंमतीच्या सुमारे ८५% इतक्या, म्हणजेच सुमारे रु.१५,१०० कोटी इतक्या रकमेपर्यंत कर्ज जायकातर्फे देण्यात येईल. सदर प्रकल्पास कर्ज देणेबाबतच्या करारावर जायकासोबत दि. ३१ मार्च, २०१७ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. प्रकल्पाच्या रु.१७,८४३ कोटी या एकूण अंदाजित किंमतीस प्राधिकरणाने दिनांक ३ जून, २०१६ रोजी झालेल्या १४०व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता दिली असल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद सांगितले. तसेच केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाने (Ministry of Environment & Forest) मुंबई पारबंदर प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता (CRZ clearance) तसेच व वनजमीन हस्तांतरणास मान्यता (Stage-1 Clearance for Diversion of Forest Land) दिल्याचेही महानगर आयुक्तांनी समितीस सांगितले.

३.४ महानगर आयुक्तांनी पुढे असेही नमूद केले की, सदर प्रकल्पाकरीता आंतरराष्ट्रीय एइकॉम एशिया कंपनी लि. (हाँगकाँग)- पडेको कंपनी लि. (जपान) - दार-अल-हंदाश (लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) कंन्सोर्शिअम यांची मुंबई पारबंदर प्रकल्पाचे सल्लागार (General Consultant) म्हणून डिसेंबर, २०१६ मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. जायकाने मुंबई पारबंदर प्रकल्पाचे बांधकाम एकूण ४ पॅकेजेसमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यापैकी ३ स्थापत्य कामाचे पॅकेजेस (Civil Works) व चौथा भाग सुनियोजित वाहतूक प्रणाली (Intelligent Transport System) या कामाचे पॅकेज आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ३ स्थापत्य पॅकेजेसच्या बांधकामाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्याचे ठरले. जायकाने विहीत केलेल्या पद्धतीनुसार पूर्वअर्हता (Pre-Qualification) व दुसऱ्या टप्प्यातील निविदा प्रक्रिया (Second-stage bidding process) अशा दोन टप्प्यामध्ये निविदा प्रक्रिया ई-निविदा पद्धतीने राबविण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले. पॅकेज-१ करीता ११, पॅकेज-२ करीता ११ व पॅकेज-३ करीता १७ अशा एकूण ३९ निविदाकारांनी (bidders) पूर्वअर्हतेकरीता प्रस्ताव सादर केले. पूर्वअर्हतेच्या निकषांनुसार पॅकेज-१ करीता ७, पॅकेज-२ करीता ७ व पॅकेज-३ करीता १५ अशा एकूण २९ निविदाकारांना पूर्वअर्हताप्राप्त घोषित करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. दुसऱ्या टप्प्यातील निविदा प्रक्रियेकरीता पूर्वअर्हताप्राप्त निविदाकारांना दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजीच्या ई-निविदा सूचनेद्वारे पॅकेज-१, पॅकेज-२ व पॅकेज-३ करीता दुसऱ्या टप्प्यातील निविदा प्रक्रियेकरीता निविदा प्रपत्रे (Bidding Documents) ऑनलाईन वितरीत करण्यात आली.

३.५ त्यानंतर, महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की, पॅकेज-१, पॅकेज-२ व पॅकेज-३ च्या निविदाकारांकडून निविदा प्रपत्रातील तरतूदींबाबत ३२२४ प्रश्न (Queries) प्राप्त झाले. या ३२२४ प्रश्नांना उत्तरे व या प्रश्नांच्या अनुषंगाने ५४० परिशिष्टे (Addenda) प्राधिकरणाच्या ई-निविदा पोर्टलवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक पॅकेज-१ करीता दिनांक १७ जुलै, २०१७ आणि पॅकेज-२ व पॅकेज-३ करीता दिनांक १८ जुलै, २०१७ होता.

३.६ महानगर आयुक्तांनी कार्यकारी समितीच्या असे असे निदर्शनास आणले की, केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने (Ministry of External Affairs) प्रकल्पाबाबत दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी बैठक बोलाविली होती. प्रकल्पाची आखणी (alignment) भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई पोर्ट ट्रस्ट, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांसारख्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील अशा ठिकाणांच्या जवळून जात असल्याने प्रकल्पाकरीता नेमण्यात येणाऱ्या कंत्राटदारांकरीता केंद्र शासनाकडून सुरक्षाविषयक परवानगी प्राप्त करणे आवश्यक असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सदर बैठकीत नमूद केले. त्या अनुषंगाने मुंबई पारबंदर प्रकल्पाकरीता निविदा सादर करणाऱ्या निविदाकारांची नावे व अन्य आवश्यक माहिती सुरक्षाविषयक परवानगी प्राप्त करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनास दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी पाठविण्यात आली.

३.७ प्रकल्पाची आखणी सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील अशा ठिकाणांच्या जवळून जात असल्याने प्रकल्पाकरीता नेमण्यात येणाऱ्या कंत्राटदारांकरीता केंद्र शासनाकडून सुरक्षाविषयक परवानगी प्राप्त होणे आवश्यक असल्याबाबतची तरतूद निविदेत आधीच करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

३.८ केंद्र शासनाने दिनांक १३ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रान्वये खाली नमूद केलेल्या निविदाकारांना सुरक्षाविषयक परवानगी नाकारली :-

१. Gayatri Projects Limited - China Railway Major Bridge Engineering Group Company Limited JV
२. JMC Projects (India) Ltd.- China Railway Construction Bridge Engineering Bureau Group Co. Ltd. JV
३. Soma Enterprises Ltd.- China Harbour Engineering Company Ltd.
४. IL & FS Engineering & Construction Company Ltd. - IL & FS Transportation Networks Limited (ITNL) JV
५. IL&FS Engineering – Ranjit Buildcon Ltd. JV

३.९ केंद्र शासनाच्या सुरक्षाविषयक परवानगी नाकारण्याच्या निर्णयास IL & FS Engineering & Construction Company Ltd. यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकेद्वारे आव्हान दिले. दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालयाने IL & FS Engineering & Construction Company Ltd. यांना निविदा सादर करण्याची संधी देण्याबाबत आदेशित केले. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार IL & FS Engineering & Construction Company Ltd. यांना निविदा सादर करण्याची संधी देण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. अशारितीने निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पॅकेज-१ करीता ६, पॅकेज-२ करीता ६ व पॅकेज-३ करीता ५ अशा एकूण १७ निविदाकारांनी निविदा सादर केल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले.

३.१० महानगर आयुक्तांनी पुढे असे नमूद केले की, प्राप्त निविदांची छाननी खालीलप्रमाणे ५ टप्प्यांमध्ये करण्यात आली :-

टप्पा-१ : Preliminary Examination of Technical Bids

टप्पा-२ : Evaluation of Compliance with the Qualification Requirement

टप्पा-३ : Determination of Responsiveness of Technical Bids

टप्पा-४ : Technical Evaluation

टप्पा-५ : Financial Evaluation

यापैकी टप्पा-१, टप्पा-२ आणि टप्पा-३ मधील निकषांना अनुसरून पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावांची छाननी टप्पा-४ मध्ये करण्यात आली.

३.११ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, AFCONS Infrastructure Limited - FLUOR Australia PTY LTD - Shapoorji Pallonji & Company Pvt Ltd JV पैकी FLUOR Australia PTY LTD यांनी जॉईंट व्हेंचर मधून माघार घेत असल्याबाबत कळविल्याने AFCONS Infrastructure Limited - FLUOR Australia PTY LTD - Shapoorji Pallonji & Company Pvt Ltd JV हे तिन्ही पॅकेजच्या निविदा प्रक्रियेकरीता अपात्र ठरले. तसेच IL&FS Transportation Networks Limited -S.P.Singla Constructions Pvt Ltd. JV यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या पुरेशी प्रतिसादात्मक (substantially

responsive) नसल्याने ते पॅकेज-१ च्या निविदा प्रक्रियेकरीता अपात्र ठरले. दरम्यान IL & FS Engineering & Construction Company Ltd. यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या सुनावणीत मागे घेतल्याने ते पॅकेज-२ च्या निविदा प्रक्रियेत अपात्र ठरले. त्याचप्रमाणे पॅकेज-३ करीता निविदा सादर केलेल्या ५ निविदाकारांपैकी J.Kumar Infraprojects Ltd.आणि NCC Limited यांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पुरेशा प्रतिसादात्मक (substantially responsive) नसल्याने ते पॅकेज-३ च्या निविदा प्रक्रियेकरीता अपात्र ठरले.

३.१२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, अशा प्रकारे, जायकाने तांत्रिक निविदा छाननी अहवालांना सहमती दर्शविल्यानंतर खालील निविदाकारांचे आर्थिक देकार (Financial offers) उघडण्यात आले :-

| | |
|---|---|
| **पॅकेज-१** आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक : १४ सप्टेंबर, २०१७ | |
| १. | Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV |
| २. | Hindustan Construction Co. Ltd. - SK Engineering & Construction Co.Ltd. |
| ३. | ITD Cementation India Limited - Simplex Infrastructures Limited - Italian Thai Development Public Company Limited - Sumitomo Mitsui Construction Co. Ltd JV |
| ४. | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium |
| **पॅकेज-२** आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक : १४ सप्टेंबर २०१७ | |
| १. | Daweoo Engineering & Construction Company Ltd-Tata Projects Ltd. JV |
| २. | Hindustan Construction Co.Ltd.-SK Engineering & Construction Co. Ltd. |
| ३. | ITD Cementation India Limited - Simplex Infrastructures Limited - Italian Thai Development Public Company Limited - Sumitomo Mitsui Construction Co. Ltd JV |
| ४. | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium |

| पॅकेज-३ आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७ | |
|---|---|
| १. | ITD Cementation India Ltd.- Thakur Infraprojects Pvt. Ltd.- JM Mhatre Infra Pvt. Ltd.JV |
| २. | Larsen & Toubro Ltd. |

३.१३ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्थापन केलेल्या निविदा मूल्यांकन समितीने (Bid Evaluation Committee) सल्लागाराच्या सहाय्याने निविदेतील निकषांच्या आधारे निविदाकारांच्या आर्थिक देकारांची छाननी केली. आर्थिक देकारांच्या छाननीअंती पॅकेज-१, पॅकेज-२ व पॅकेज-३ च्या निविदाकारांचे सुधारीत आर्थिक देकार (Corrected Bid Prices) खालीलप्रमाणे :-

| पॅकेज-१ | | Estimated cost including all taxes and Provision sum | Corrected Bid Prices in INR including GST & Provisional Sum | Position | Percentage +/- with respect to Estimated cost |
|---|---|---|---|---|---|
| १. | Daweoo Engineering & Construction Company Ltd - Tata Projects Ltd. JV | रु. ७२४९ कोटी | ७३३९,९७,२८,८८५.००<br>(रु. ७३३९.९७ कोटी) | L1 (Lowest) | + १.२५ % |
| २. | Hindustan Construction Co. Ltd. - SK Engineering & Construction Co.Ltd. | | ८६८५,४०,४८,१९८.३६<br>(रु. ८६८५.४० कोटी) | L3 | + १९.८० % |
| ३. | ITD Cementation India Limited - Simplex Infrastructures Limited - Italian Thai Development Public Company Limited - Sumitomo Mitsui Construction Co. Ltd JV | | ९२५४,७०,९८,६२२.००<br>(रु. ९२५४.७१ कोटी) | L4 | + २७.६७ % |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium | | ७६३७,२९,६१,०२४.३९ (रु. ७६३७.३० कोटी) | L2 (Second Lowest) | + ५.३६ % |
| **पॅकेज-२** | | **Estimated cost including all taxes and Provision sum** | **Corrected Bid Prices in INR including GST & Provisional Sum** | **Position** | **Percentage +/- with respect to Estimated cost** |
| १. | Daweoo Engineering & Construction Company Ltd-Tata Projects Ltd. JV | **रु. ५४१६ कोटी** | ५६,१२,६०,६१,५५३.०० (रु. ५६१२.६१ कोटी) | L1 (Lowest) | + ३.६३ % |
| २. | Hindustan Construction Co.Ltd.-SK Engineering & Construction Co. Ltd. | | ६४,६१,४३,१५,२८९.०० (रु. ६४६१.४३ कोटी) | L3 | + १९.४६ % |
| ३. | ITD Cementation India Limited - Simplex Infrastructures Limited - Italian Thai Development Public Company Limited - Sumitomo Mitsui Construction Co. Ltd JV | | ६८,३०,६८,८२,६०९.०० (रु. ६८३०.६९ कोटी) | L4 | +२७.१७ % |
| ४. | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium | | ६०,९७,७३,६०,६४०.०० (रु. ६०९७.७४ कोटी) | L2 (Second Lowest) | + १२.५९ % |

| पॅकेज-३ | | Estimated cost including all taxes and Provision sum | Corrected Bid Prices in INR including GST & Provisional Sum | Position | Percentage +/- with respect to Estimated cost |
|---|---|---|---|---|---|
| १. | ITD Cementation India Ltd.- Thakur Infraprojects Pvt. Ltd.- JM Mhatre Infra Pvt. Ltd.JV | **रु. १४७२ कोटी** | १५४२,७८,४२,८६०.८० **(रु. १५४२.७८ कोटी)** | L2 (Second Lowest) | **+४.८० %** |
| २. | Larsen & Toubro Ltd. | | १०१३,७९,०१,०२३.८७ **(रु. १०१३.७९ कोटी)** | **L1 (Lowest)** | **- ३१.१४ %** |

३.१४ महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले की, Daweoo Engineering & Construction Company Ltd-Tata Projects Ltd. JV यांचे पॅकेज-१ व पॅकेज-२ करीताचे आर्थिक देकार हे लघुत्तम आहेत. तसेच निविदेतील तरतूदींनुसार प्रकल्पाचे पॅकेज-१ व पॅकेज-२ कोणत्याही एका कंत्राटदाराला देता येत नसल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. निविदेतील ITB 41.1 प्रमाणे Lowest Combined किंमतीच्या धोरणानुसार पुढीलप्रमाणे पर्याय तपासण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले :-

| पर्याय | पॅकेज-१ | पॅकेज-२ | पॅकेज-३ | एकूण किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV (रु. ७३३९.९७ कोटी) | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium (रु. ६०९७.७४ कोटी) | Larsen & Tourbo Ltd. (रु. १०१३.७९ कोटी) | १४४५१.५०* |
| २ | Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium (रु. ७६३७.३० कोटी) | Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV (रु. ५६१२.६१ कोटी) | Larsen & Tourbo Ltd. (रु. १०१३.७९ कोटी) | **१४२६३.७०*** |

* पर्याय १ व २ मधील एकूण किंमतीतील फरक रु. १८७.८ कोटी

३.१५ महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणले की, वरील तक्त्यातील दुसरा पर्याय स्विकारला असता प्राधिकरणाच्या एकूण खर्चात सुमारे रु. १८७.८ कोटी इतकी बचत होते. जायकाने, पॅकेज-१, पॅकेज-२ व पॅकेज-३ करीता वरीलप्रमाणे आर्थिक निविदा छाननी अहवालास (Financial Bid Evaluation Report) आणि वरील पर्याय २ ची शिफारस करणाऱ्या एकत्रित धोरण अहवालास (Combined Strategy Report) सहमती दर्शविली. निविदेतील तरतूदींनुसार निविदाकारांशी करारासंदर्भात वाटाघाटी करण्यात आल्या. या अनुषंगाने निविदाकारांकडून काही तांत्रिक बाबींसंबंधी तसेच वस्तु व सेवा करातील फरकाबाबत प्राधिकरणाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या पत्रांन्वये स्पष्टीकरणे (clarifications) मागविल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. या अनुषंगाने Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium आणि Larsen & Toubro Limited या निविदाकारांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी तर Daweoo Engineering & Construction Company Ltd - Tata Projects Ltd. JV या निविदाकाराने दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी स्पष्टीकरणे सादर केली. निविदा सादर करताना वस्तु व सेवा कराचा (Goods and Services Tax) दर १८% इतका होता तर दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ पासून वस्तु व सेवा कराचा दर १२% इतका झाला. सदर बाब लक्षात घेता निविदाकारांनी त्यांचे स्पष्टीकरणांसोबतच त्यांचे देकारावर वस्तु व सेवा करातील फरकामुळे पॅकेज-१ करीता रु. ३८०.३४ कोटी, पॅकेज-२ : रु.७१.०२ कोटी आणि पॅकेज-३ : रु. ४८.०९ कोटी इतकी घट (reduction) देण्याचे प्रस्तावित केल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले. Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium या निविदाकाराने पॅकेज-१ करीता तसेच Larsen & Toubro Limited या निविदाकाराने पॅकेज-३ करीता वस्तु व सेवा कराच्या दरामध्ये झालेल्या फरकाइतकीच, म्हणजेच देकारातून provisional sum वगळता रक्कमेच्या ६% घट प्रस्तावित केली आहे. तर Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV या निविदाकाराने त्यांच्या दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये देकारातून provisional sum वगळता रक्कमेच्या १.२९ % इतकी घट प्रस्तावित केली आहे.

३.१६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांनी त्यांना देय असलेल्या input GST व output GST यातील फरकाइतक्या रकमेची घट प्रस्तावित केली असल्याचे दिसून येते. याबाबत प्राधिकरणाने विधी सल्लागाराकडून कायदेशीर सल्ला घेतला. विधी सल्लागाराने असे निदर्शनास आणले की, Daweoo Engineering & Construction Company Ltd - Tata Projects Ltd. JV यांच्या सेवांचा अंतर्भाव, वस्तु व सेवा कर कायद्याच्या schedule II च्या entry 5b मध्ये होत असल्यास, त्यांचेकडून त्यांच्या input GST व output GST यातील फरकाइतक्या रकमेचा वस्तु व सेवा कराचा मोबदला प्राधिकरणास देय असेल. तथापि, जर Daweoo Engineering & Construction Company Ltd - Tata Projects Ltd. JV यांच्या सेवांचा अंतर्भाव, वस्तु व सेवा कर कायद्याच्या schedule II च्या entry 5b मध्ये होत नसल्याचे प्राधिकरण व Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांनी एकमताने मान्य केल्यास, परस्पर सामंजस्याने मान्य असलेला वस्तु व सेवा कराचा परताव्याच्या रकमेचा मोबदला प्राधिकरणास देय असेल. परंतु Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांना या फरकाची निश्चित रक्कम सद्य:स्थितीत ठरविणे शक्य होणार नाही. Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांनी प्रत्यक्षात काम करतेवेळी सादर केलेल्या वस्तु व सेवा कराच्या परताव्यानंतरच (GST return) वस्तु व सेवा कराची निश्चित रक्कम ठरविणे शक्य होईल व त्यानुसार Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांना वस्तु व सेवा कराच्या परताव्याची भरपाई करण्यात येईल.

३.१७ कार्यकारी समितीच्या सदस्यांमध्ये उपरोक्त मुद्दयांबाबत सविस्तर चर्चा झाली. पॅकेज-१ व पॅकेज-२ च्या कंत्राटदारांनी वस्तु व सेवा कराचा दर कमी झाल्याने वेगवेगळी घट प्रस्तावित केली असल्याने एक पेचप्रसंग झाला असल्याचे मत सदस्यांनी व्यक्त केले.

३.१८ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती तसेच श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की करांच्या दरामध्ये बदल झाल्यास निविदेमध्ये याबाबत

असलेल्या तरतूदींनुसार कंत्राटदाराकडून वस्तुस्थितीनुसार (Actuals) योग्य ती घट प्राप्त करून घेता येईल.

३.१९ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सुचविले की, Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV या कंत्राटदारास पॅकेज-१ व पॅकेज-३ च्या कंत्राटदारांनी ज्या दराने घट प्रस्तावित केली आहे त्याच दराने घट प्रस्तावित करण्यास प्राधिकरणाने विनंती करावी. सदर कंत्राटदाराने ते जरी निषेधासहीत (under protest) मान्य केल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ती स्विकारून पॅकेज-१, पॅकेज-२ व पॅकेज-३ च्या कंत्राटदारांना स्विकृतीपत्र द्यावे. तसेच त्यांनी पुढे असेही सुचविले की,पॅकेज-२ च्या कंत्राटदाराने पॅकेज-१ व पॅकेज-३ च्या कंत्राटदारांने वेगळ्या दराने घट प्रस्तावित केल्याने कंत्राटदाराने याबाबत सक्षम प्राधिकरणाकडून (Competent Authority) advance assessment बाबत अभिप्राय (Ruling) प्राप्त करून प्राधिकरणास कळवावे.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३३५ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज-१ करीता Larsen & Toubro Limited, India - IHI Infrastructure Systems Co. Ltd. Consortium यांचा रु.७६३७.३० कोटी किंमतीचा (Including Provisional Sum), पॅकेज-२ करीता Daweoo Engineering & Construction Company Ltd -Tata Projects Ltd. JV यांचा रु.५६१२.६१ किंमतीचा (Including Provisional Sum) आणि पॅकेज-३ करीता Larsen & Tourbo Ltd. यांचा रु. १०१३.७९ कोटी (Including Provisional Sum) किंमतीचे आर्थिक देकार, वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले

..१५/-

बदल  व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून,  स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** निविदेतील तरतूदींनुसार प्रकल्पाच्या पॅकेजेसकरीता कंत्राटदारांची नेमणूक इ. पुढील कार्यवाही करणेकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ :** **वडाळा भारवाहक तळ येथील नियोजित इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व संकल्पन, इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक मंजूऱ्या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनविणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्ती करणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामांसाठी सल्लागाराची लघुत्तम निविदेस मान्यतेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ०५ जून, २०१० रोजीच्या मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत वडाळा ट्रक टर्मिनस मानखुर्द अथवा मुंबईबाहेर हलवून सदर भाग वांद्रे कुर्ला संकुलाप्रमाणे विकसित करण्याचे ठरले त्याप्रमाणे प्रारूप आराखड्याचे बीजीटीए, महासंघ व इतर भाडेपट्टेदारांना वितरीत केलेल्या भूखंडाचे पुनर्स्थान निश्चयन करण्याबाबत भाडेपट्टेदार सहमतीनंतर प्राधिकरणाच्या १३९व्या बैठकीत सदर भाडेपट्टेदारांसोबत सामंजस्य करार करण्याची मान्यता घेऊन करार करण्यात आला आहे. सदर प्रारूप आराखड्याप्रमाणे भाडेपट्टेदारांच्या भूखंडाचे पुनर्स्थान करण्याकरिता एक भूखंड वडाळा येथील सर्व्हे नं ८ चा भाग, प्लॉट क्र. २७ व २८ राखीव ठेवण्यात आला आहे. त्याप्रमाणे भाडेपट्टेदारांना वितरीत केलेल्या भूखंडाना एकाच भूखंडावर पुनर्स्थापित करून मोकळे झालेल्या भूखंडाचे इष्टतम वापर करता येईल.

४.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले कि, त्यानुसार सदर जागेवर इमारतीचे बांधकाम करण्याचे ठरविण्यात आले होते व त्याकरीता इमारतीच्या आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व

संकल्पन, इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक मंजुऱ्या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनविणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्ती करणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामे या बाबींचा समावेश करून सल्लागाराच्या नेमणुकीसाठीची निविदा प्रक्रिया करण्यात आली.

४.३ महानगर आयुक्तांनी सल्लागारांच्या नेमणुकीसाठीच्या निविदेप्रक्रियेची माहिती देताना सांगितले की, सदर कामासाठी प्रथम निविदेदरम्यान दोन सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते तथापि कमीत कमी ३ प्रस्ताव प्राप्त न झाल्याने फेरनिविदा (द्वितीय विनंती प्रस्ताव) मागविण्यात आल्या. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, द्वितीय निविदेमध्ये मे. स्टूप कंसल्टंटस् प्रा. लि. – मे. मास्टर मॅनेजमेंट कंसल्टंटस् प्रा. लि. (जेव्ही) व मे. स्कायलाईन आर्किटेक्टस् – मे. फेअरवूड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि. (जेव्ही) या दोन सल्लागारांचे निविदा प्रस्ताव प्राप्त झाले. निविदा सूचनेमध्ये विहित केल्याप्रमाणे पात्रता निकषास अनुसरून सल्लागारांचे तांत्रिक व आर्थिक गुण संयुक्त करण्यात आले. पात्रता निकषांना अनुसरून तांत्रिक निकषांना ७०% भार व आर्थिक निकषांना ३० % भार देण्यात आला.

४.४ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राप्त देकारात सल्लागार मे. स्कायलाईन आर्किटेक्टस् – मे. फेअरवूड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि. (जेव्ही) यांचा रू.१७,०५,१८,६०२.२० इतक्या किंमतीचा आर्थिक देकार निविदेच्या अंदाजित किंमतीचा ३.८४% असलेला प्रथम देकार आहे. तसेच मे. स्कायलाईन आर्किटेक्टस् – मे. फेअरवूड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि. (जेव्ही) यांनी आर्थिक व तांत्रिक एकत्रित मूल्यांकनाच्या क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळवला व त्यामुळे मे. स्कायलाईन आर्किटेक्टस् – मे. फेअरवूड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि. (जेव्ही) यांचा देकार लघुत्तम म्हणून प्राधिकरणाच्या निविदा समितीने मान्य केला.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३३६ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती वडाळा भारवाहकतळ येथील नियोजित इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व संकल्पन, इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक मंजुऱ्या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनविणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्ती करणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामाच्या सल्लागार मे. स्कायलाईन आर्किटेक्टस् - मे. फेअरवूड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि (जेव्ही) यांच्या लघुत्तम निविदेस रू. १७,०५,१८,६०२.२० म्हणजेच निविदेच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या ३.८४% इतका आर्थिक देकार होण्याऱ्या संभाव्य आर्थिक बदलास अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

“**असाही ठराव करणे येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासबंधी आवश्यक पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.५ : मेट्रो मार्ग-४ मार्गिकेसाठी [वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली] डेपो, स्टेशन, स्टाफ क्वार्टर, ओसीसी, ऑक्सिलरी स्ट्रक्चर्ससाठी ई आणि एम वर्क्स, सिव्हिल वर्क्स यांच्यासह आर्किटेक्चरल आणि बिल्डिंग सर्व्हिसेससाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (डीडीसी) ची नियुक्ती करणेबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई शहरात पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु. ३५,४०० कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग ४ साठी अंदाजीत केलेल्या ₹ १४,५४९ कोटी प्रकल्प किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक ३ जून, २०१६ रोजीच्या १४०व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रकल्पास मान्यता मिळाली आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, DMRC यांनी दिल्ली व अन्य शहरांतील मेट्रो प्रकल्पांच्या धर्तीवर DDC सल्लागार नेमणूकीसाठी अंदाजपत्रक व मसुदा निविदा सादर केली होती. सल्लागारांकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. कंत्राटदाराने सादर केलेल्या संकल्पचित्रांची पुरावा तपासणी (Proof Checking) करणे.
२. स्थानकांच्या इमारतीचे वास्तुकला योजना (Architectural Scheme) तसेच विद्युत व यांत्रिकी सेवांचे संकल्पचित्र बनविणे.
३. डेपोतील इमारतींचे विस्तृत संकल्पचित्र बनविणे.

५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ४ च्या (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य, वास्तु आणि इमारत सेवा, विद्युत व यांत्रिकी कामासाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) ची नियुक्ती करणेकरिता ई-निविदा मागविण्यासाठी सकाळ व डी.एन.ए. या वृत्तपत्रात दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पुर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी ४ ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाले आणि दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. |
| २ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia- Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) |
| ४ | Consortium M/s EPTISA Services de Ingenieria, S.L. & M/s. PADECO Co Ltd. and PADECO India Pvt. Ltd. |

५.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक छाननी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात आली. या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | पात्र /अपात्र |
|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. | **पात्र** |
| २ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia-Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. | **पात्र** |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) | **पात्र** |
| ४ | Consortium M/s. EPTISA Services de Ingenieria, S.L. & M/s. PADECO Co Ltd. and PADECO India Pvt. Ltd. | **अपात्र** |
| | **एकूण** | **०३/०४** |

तसेच, तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात आले.

प्राप्त वित्तीय प्रस्ताव (जीएसटी वगळता) खालीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. | ₹ १०,९०,००,०००/- |
| २ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia-Ingegneria Indtegrata SPA & M/s TATA Consulting Engineers Limited. | ₹ १०,९९,००,०००/- |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) | ₹ १२,९८,६०,०००/- |

उघडलेल्या सर्व आर्थिक प्रस्तावांची छाननी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात आली. प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी भारतीय रुपयात रुपांतर करण्यात आले आहे. त्यासाठी अंतिम निविदा सादर तारखेच्या २८ दिवस आधीच्या म्हणजेच

..२०/-

दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजीचे विनिमय दर (१€ = ₹ ७६.९०) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचा रुपयात निविदाकाराने दिलेल्या किंमतीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदाकाराने दिलेली किंमत (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. | १८.८६ कोटी | १०.९० |
| २ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia- Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. | | १०.९७ |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) | | १२.९८ |

५.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांच्या रु. १०.९० कोटी (अंदाज पत्रकातील किंमती पेक्षा ४२.२३% कमी) + GST किंमतीचा देकार लघुत्तम आहे. या संदर्भात प्राधिकरणाने M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांना Metro-PIU/Line-४/DDC/SYSTRA/२०१७/३७१ दिनांक २६.१०.२०१७ पत्रान्वये निविदेमधील कामाची व्याप्ती समजली आहे व त्यानुसार त्यांनी आर्थिक प्रस्ताव सादर केला आहे का? याबाबत स्पष्टीकरण मागितले. त्यास अनुसरून M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांनी त्यांचे पत्र क्र.SMCIPL/BD/१७/P/DDC-MMRDA/००६६ दिनांक २६.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कामाची व्याप्ती समजली असून त्याप्रमाणेच प्रस्ताव सादर केल्याचे कळविले आहे. निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, स्पर्धात्मक व रास्त आहेत.

५.६ तसेच दिनांक ०४.०९.२०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये निविदा शिफारस समिती गठीत केली असून, त्यामध्ये अतिरिक्त महानगर आयुक्त यांचा अध्यक्ष, १) संचालक (प्रकल्प) - मेट्रो २) वित्त सल्लागार ३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग ४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. Metro-PIU, MMRDA यांचा अहवाल

निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक २७.१०.२०१७ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवाल निविदा शिफारस समितीने स्विकारण्याची शिफारस केली आहे.

५.७ वरील प्रस्तावावर चर्चा करताना, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी M/s SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. या कंपनीने अंदाज पत्रकातील किंमती पेक्षा ४२.२३% कमी + GST असा आर्थिक प्रस्ताव सादर केला असून, त्यानुसार M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. मुंबई मेट्रो मार्ग-४ च्या प्रकल्पासाठी काम करू शकेल का, अशी विचारणा केली, यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी सांगीतले की, M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांनी यापूर्वी भारतात DMRC व लखनौ मेट्रो प्रकल्पामध्ये तत्सम कामे केली आहेत, तसेच भारतात इतर विविध मेट्रो प्रकल्पामध्ये तत्सम कामे करत आहेत. M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. ह्यांचा मेट्रो क्षेत्रातील कामाचा अनुभव पाहता ते मुंबई मेट्रो मार्गिका-४ प्रकल्पाकरिता सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) म्हणून काम करू शकतील.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३३७ :-**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे M/s. SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांचा रु. १०.९० कोटी (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या -४२.२३%) सर्व कराच्या जबाबदाऱ्यांसह (जीएसटी वगळून) किंमतीचा लघुत्तम देकार ई-निविदा स्विकारण्यास व DDC म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..२२/-

**बाब क्र.६ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई-पुणे (जुन्या) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर नावडेफाटा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे संकल्पन व बांधकाम करणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामांच्या लघुत्तम ई-निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीमध्ये नावडेफाटा जंक्शन येथील उड्डाणपुलाच्या बांधकामाच्या अंदाजित किंमत रु.३४.०० कोटी रक्कमेस मंजूरी देण्यात आली होती, तसेच प्रशासकीय मान्यतेत मंजूर असलेल्या ३+३ मार्गिकेच्या उड्डाणपुलाची लांबी पोहोचमार्गासहित ५९०.० मीटर इतकी होती. सदर रक्कम ही ढोबळ अंदाजपत्रकावर आधारीत होती. तसेच प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी कामाचे सखोल सर्वेक्षण करण्यात येऊन त्यावर आधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार निविदा मागविण्यात याव्यात असे निर्देश होते.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक १३ जुलै, २०१७ रोजी झालेल्या १४३व्या बैठकीमध्ये नावडेफाटा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे संकल्पन व बांधकाम करणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणेच्या कामांस रु.६३.२८ कोटी इतक्या किमंतीच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, तांत्रिक सल्लागार समितीने अंतिम शिफारस केल्याप्रमाणे उड्डाणपुलांच्या बांधकामासाठी इच्छुक ठेकेदाराकडून ठोक रकमेवर (Lump Sum) स्वत:चे संकल्पचित्र बांधकामावर (Design build) आधारीत दिनांक २२.०३.२०१७ रोजी जाहीर ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसाद देऊन मे. जीएचव्ही इंडिया प्रा. लिमिटेड व मे. रेलकॉन इंफ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड या फक्त दोनच निविदाकारांनी स्वारस्य दाखविले. तद्नंतर, सदर ई-निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने निविदा न उघडताच ती रद्द करुन दिनांक २९.०५.२०१७ रोजी द्वितीय बोलीसाठी पुन:श्च ई-निविदा मागविण्यात आली. त्यास प्रतिसाद देऊन मे. जीएचव्ही इंडिया प्रा. लिमिटेड व मे. रेलकॉन इंफ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड पुन्हा फक्त या दोनच निविदाकारांनी स्वारस्य दाखविले. तद्नंतर, सदर ई-निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदा न उघडताच ती रद्द करुन दिनांक ०४.०७.२०१७ रोजी

..२३/-

तृतीय बोलीसाठी पुन:श्च ई-निविदा मागविण्यात आली. त्यास प्रतिसाद देऊन तीन निविदाकारांनी स्वारस्य दाखविले. ई-निविदेस प्रतिसाद देऊन खालील तीन निविदाकारांनी स्वत:च्या संकल्पचित्रासह निविदा सादर केल्या.

६.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे. श्रीखंडे कंसल्टंट प्रा. लि. या सल्लागाराने तीन प्राप्त निविदांची अर्हता निकषानुसार छाननी करुन सल्लागारांनी सादर केलेल्या निविदा अर्हता निकष समाधानकारकरीत्या पूर्ण करीत असल्याची नोंद घेऊन निविदाकारांचे आर्थिक लिफाफे उघडण्याची शिफारस केली. त्यानंतर निविदा शिफारस समितीसमोर सविस्तर बाब ठेवण्यात आली. समितीने निविदा अर्हता निकष, तांत्रिक बाबी, संकल्पचित्र इ. चे सखोल अवलोकन करुन लिफाफे उघडण्यास समितीने मान्यता दिली. सदर निविदाकारांचे आर्थिक लिफाफे दिनांक २०.०९.२०१७ रोजी उघडण्यात आले. आर्थिक देकारांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | देकाराची रक्कम रु. कोटीत | टक्केवारी % | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. जीएचव्ही इंडिया प्रा. लिमिटेड. | ७५.८५८६ | ३८.०० अधिकतम दराची | तृतीय लघुतम |
| २. | मे. रेलकॉन इंफ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड. | ६३.२७ | १५.०९९ अधिकतम दराची | द्वितीय लघुतम |
| ३. | मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड | ६२.४६ | १३.६२ अधिकतम दराची | प्रथम लघुतम |

६.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची निविदा ही अंदाजपत्रकापेक्षा (+) १३.६२% इतक्या चढ्या दराची असल्यामुळे निविदा निविदाकारानी भरलेल्या ठोक रकमेच्या देकाराबाबत स्पष्टीकरण दिनांक २०.०९.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे मागविण्यात आले. मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची निविदा ही अंदाजपत्रकापेक्षा (+) १३.६२% इतक्या चढ्या दराची असल्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये शासनाने जीएसटी १८ % वरुन १२ % पर्यंत कमी केला त्यानुसार निविदाकारास ६ टक्क्यांनी देकार कमी करण्याची विनंती केली. वाटाघाटीनंतर निविदाकाराने देकार कमी करुन मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांनी रु. ५९,२८,४०,०००/- असा सुधारित देकार सादर केला.

६.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वरील स्पष्टीकरण व निविदाकाराचा अंतीम देकार निविदा शिफारसी समितीच्या बैठकीसमोर ठेवण्यात आली. सदर स्पष्टीकरणावर विचार करुन निविदा शिफारसी समितीने मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची लघुत्तम दराची निविदा ही ७.८५ टक्क्यांनी जास्त दराची असल्याने दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या नवीन दरसुचीनुसार अंदाजपत्रक तपासण्यात यावे व त्यानुसार मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची लघुत्तम दराची निविदा कमी किंवा जास्त आहे हे तपासून पहावे व त्यानंतर ठेकेदाराशी अंतीम वाटाघाटी कराव्यात असा निर्णय दिला. मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांना पुन्हा वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांनी दिनांक २५.१०.२०१७ रोजी पत्राद्वारे सादर केले की, बांधकाम साहित्याचे बाजारभाव प्रमाणे असलेले दर विचारात घेऊनच देकार सादर केला आहे, तसेच यापुर्वीच्या वाटाघाटीमध्ये रु. ३,१७,५९,३२२/- अधिक रु. ६७८/- इतक्या रक्कमेने पुर्वी सादर केलेला देकार कमी केला आहे, तसेच निविदाकाराने बाजारभावानुसार बांधकाम साहित्यांचे दर कमी/जास्त झाल्यास त्यानुसार फरक अदा करण्याची तरतुद (Price variation clause) निविदेमध्ये असल्याचे नमुद केले आहे. निविदाकाराने त्यांनी सादर केलेला देकार न्युनतम असून यापुढे अजून देकार कमी करणे शक्य होणार नाही, तरी रु.५९,२८,४०,०००/- इतक्या किमंतीचा देकार स्वीकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६.७ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर कामाची किंमत सन २०१७-१८ च्या नवीन ई-दरसुचीनुसार रु. ५०,६६,८२,४८०/- इतकी येते. यामध्ये १२% जीएसटीचा बोजा विचारात घेतल्यास ती रु. ६,०८,०१,८९८/- इतकी रक्कम येत आहे. एकूण जीएसटी बोजा हा १२% याप्रमाणे धरल्यास दरसुचीनुसार येणारी रक्कम (जीएसटी बोजासह) रु.५६,७४,८४,३७८/-आहे. निविदाकाराने सादर केलेल्या देकाराची या रक्कमेशी तुलना केल्यास निविदाकाराचा देकार ४.४७ टक्क्यांनी जास्त येतो. वरील सदर बाब निविदा समितीसमोर सादर केली असता निविदा शिफारसी समितीने सर्व बाबींचा विचार करुन मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची लघुत्तम दराची निविदा प्राधिकरणाच्या आगामी कार्यकारी समितीच्या बैठकीसमोर सादर करण्यास मान्यता दिली.

६.८ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील सर्व बाबींचा विचार करता मुंबई-पुणे (जुन्या) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर नावडेफाटा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे संकल्पन

व बांधकाम करणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामांच्या बांधकामाकरीता मे.टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय किमंतीपेक्षा ७.८५% चढ्या दराची लघुत्तम निविदा रक्कम रु.५९,२८,४०,०००/- ही निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारी, सुसंवादी असल्याने कार्यकारी समितीने मान्यता देण्यास करण्यास हरकत नसावी.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३३८ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, मुंबई-पुणे (जुन्या) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर नावडेफाटा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे संकल्पन व बांधकाम करणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामांच्या बांधकामाकरीता मे. टी अँड टी इंफ्रा प्रा. लिमिटेड यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.५९,२८,४०,०००/- अधिक निविदेनुसार देय होणारी भाववाढ स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

**बाब क्र.७ :** **प्राधिकरणाचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

७.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ जूलै, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७</u>**

८.१ दिनांक ०१ जुलै, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

**<u>बाब क्र.९ :</u>** **<u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७</u>**

९.१ मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********